भिवंडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ८४ /२०२६ दि. २३ /०४/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, ठाणे वाहतुक विभागाचे कार्यक्षेत्रातील भिवंडी वाहतुक उपविभागाचे हद्दीत दि. १४/०४/२०२६ रोजी **डॉ. बाबासाहेब आंबेडकर १३५ वी जंयती** साजरी करण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – १) मुंबई/ठाणे/मानकोली कडून जुना ठाणे आग्रा रोडने धामणकर नाका मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **धामणकर नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने धामणकर नाका, कल्याण नाका, वंजारपट्टी मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – २) रांजनोली चौकातून भिवंडी शहरातून स्व. आनंद दिघे चौकातून तीन बत्ती कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **स्व. आनंद दिघे चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने स्व. आनंद दिघे चौक, वंजारपट्टी मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – ३) छत्रपती शिवाजी महाराज चौकातून धामणकर नाका कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **केशरबाग नाका, दिपक फॅब्रिक दुकानाजवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने छत्रपती शिवाजी महाराज चौकातून वंजारपट्टी नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसूचना दि. १४/०४/२०२६ रोजी दुपारी १४:०० ते २४:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण.
मा. आयुक्त, निजापूर शहर महानगरपालिका, भिवंडी/बृहन्मुंबई
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२/वि.शा.ठाणे.

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, भिवंडी

विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी

नियंत्रण कक्ष अधिकारी, भिवंडी/ठाणे.

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष ,ठाणे.

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, भिवंडी व पो.निरी. भिवंडी, नारपोली, कोनगांव वाहतूक उप विभाग ठाणे.